# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/07/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर सोनेझरी उमरेड येथे दिनांक 15/07/2020 चे 03.00 वा. ते 13.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– दिपक मानीकराव डोंगरे, वय 37 वर्ष, रा. सुनील वैद्य यांचे घरी किरायने सोनेझरी उमरेड यांचे मोबाईलवर आरोपीने फोन करून म्हटले की, 'एअरटेल कंपनीचे सिम अपडेट करायचे आहे, त्याकरीता मी एक लिंक पाठवित आहे, आपण ओपन करा कनफॉर्म करण्याकरीता 1 दाबा' असे सांगुन फिर्यादीचे मोबाईल वर लिंक पाठविली. यानंतर फिर्यादीने लींक ओपन करून कनफॉर्म करीता 1 दाबला असता फिर्यादीचे एअरटेल कंपनीचे सिम हॅक होउन फिर्यादीचे आयसीआयसीआय बॅक शाखा उमरेड खात्यामधुन एकुण 1,84,025/– रू. आरोपीने ऑनलाईन पध्दतीने काढुन फिर्यादीची फसवणुक केली

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादवी, सहकलम 66(5) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परि उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील उमेरड विभाग या करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर चारगाव येथे दिनांक 16/07/2020 चे 04:15 वा. ते 04:28 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मदन रामलाल ठाकुर, वय 43 वर्ष, रा. चारगाव यांच्या एमएच– 40/बीजी– 1091 क्रमांकाचा 6 चक्का ट्रक मधील डिझल आरोपी नामे क्र. 1) भोला दिलीप वरकडे व 2) एकनाथ कुजरे दोन्ही रा. खरपडा यांनी संगणमत करून फिर्यादीच्या ट्रक मधुन डिझेल काढुन चोरून नेल्याचा प्रयत्न केला व एक आरोपी पडुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रावते 9420409454 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर